सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७५ | शनिवार, दि. २७ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ Ct सोने ९९.५०% | ₹ १४४००० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १३१००० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११०००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २२८०/- |

भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन



सौ. सरोजताई भांडारकर
अमळनेर





अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिर परिसरात नव्याने विकसित करण्यात आलेल्या संतश्री सखाराम महाराज रोपवाटिकेस शुक्रवार, दि. २६ जून रोजी भेट देऊन फलक अनावरण करताना संतश्री प. पू. प्रसाद महाराज. शेजारी मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी यांच्यासह मंगल सेवेकरी आर. टी. पाटील, ए. डी. भदाणे आदी. दुसऱ्या छायाचित्रात संतश्री प. पू. प्रसाद महाराज यांचे पाद्यपूजन करताना सुरेश बाविस्कर, दिलीप बहिरम व गिरीश कुलकर्णी. (छायाचित्रे : मयूर चौधरी)

# श्री मंगळग्रह मंदिर परिसरात संतश्री सखाराम महाराज रोपवाटिका झाली नव्याने विकसित

## विकसित केलेल्या विविध विभागांसह निसर्ग बैठक स्थळाची संतश्री प. पू. प्रसाद महाराजांकडून पाहणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित ख्यातकीर्त श्री मंगळग्रह मंदिर परिसरात नव्याने विकसित करण्यात आलेल्या संत श्री सखाराम महाराज रोपवाटिकेस शुक्रवार, दि. २६ जून रोजी सायंकाळी संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानाचे गादिपती प. पू. प्रसाद महाराज यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी रोपवाटिकेची पाहणी केली. तसेच रोपवाटिकेत तयार करण्यात आलेले स्वतंत्र विविध विभाग, परिसरातील सुशोभीकरण, पर्यावरण संवर्धनासाठी करण्यात आलेले प्रयत्न आणि भाविकांसाठी निर्माण करण्यात आलेल्या सोयी-सुविधांबद्दल कौतुक करत मंगळग्रह सेवा संस्थेच्या या उपक्रमास भरभरून शुभेच्छा देत कृपाशीर्वादही दिला.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेचे ग्रीनरी कन्स्लंटट श्री. सुबोध पाटील यांच्या सहकार्याने गेल्या २० वर्षांपासून या रोपवाटिकेचे संगोपन केले जात होतेच. मात्र, रोपवाटिकेत विविध विभाग तयार करून ती अधिकाधिक भव्य-दिव्य स्वरूपात विकसित करावी, या उद्देशातून नुकतेच या रोपवाटिकेचे व्यापक नूतनीकरण करण्यात आले आहे. रोपवाटिकेमध्ये विविध प्रकारच्या औषधी वनस्पती, फुलझाडे, शोभिवंत वृक्ष, फळझाडे तसेच पर्यावरण संवर्धनाला चालना देणारे विविध विभाग विकसित करण्यात आले असून, भाविकांना निसर्गाच्या सान्निध्यात अध्यात्माचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने परिसराचे आकर्षक नियोजन करण्यात आले आहे.

संतश्री प. पू. प्रसाद महाराज यांनी रोपवाटिकेतील विविध विभागांची पाहणी करून त्यामागील संकल्पना जाणून घेतली. मंदिर परिसरातील हरित उपक्रम, स्वच्छता आणि पर्यावरणपूरक विकासाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. भविष्यातही अशा उपक्रमांमुळे समाजामध्ये पर्यावरण संरक्षणाचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी, संतश्री प. पू. प्रसाद महाराज यांनी श्री मंगळग्रह मंदिरात जाऊन श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांचे मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते पाद्यपूजन करण्यात येऊन यथोचित स्वागत करण्यात आले. मंदिराचे पुरोहित शुभम वैष्णव, हेमंत गोसावी, पवन शर्मा यांनी पौरोहित्य केले. यावेळी संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानातील सुदाम पाटील महाराज, हर्षल जोशी महाराज, सारंग पाठक, मंगल सेवेकरी आर. टी. पाटील, ए. डी. भदाणे यांच्यासह मंदिराचे सेवेकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रोपवाटिकेतील विविध विभाग

संत श्री सखाराम महाराज रोपवाटिकेच्या नूतनीकरणात विविध विभाग नव्याने तयार केले आहेत. त्यामध्ये गांडूळ खत प्रकल्प, गोवरी, प्लास्टिक क्रशिंग, गुलाब बाग, वृक्षारोपण, जैविक खतप्रणाली आदी विभागांसह रोपवाटिकेशेजारीच भाविकांना निसर्ग सान्निध्याचा मनमुराद आनंद घेता यावा, या उद्देशातून निसर्ग बैठक स्थळही तयार करण्यात आले असून, हे स्थळ विविध वृक्षराजीने सज्ज झालेले आहे.

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!



**'तहसील'बाहेर दरवर्षीच पावसाळ्यात डबके!**

पान २ वर

## निषेध खासदाराच्या वक्तव्याचा...!



अमळनेर : शिवसेनेचे (शिंदे गट) खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना केलेल्या अपमानास्पद वक्तव्याचा निषेध करून त्यांच्यावर तातडीने कठोर कारवाई व्हावी, या मागणीचे शुक्रवार, दि. २६ जून रोजी अमळनेर उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते यांना व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देताना तालुकाध्यक्ष उमेश काटे, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, जिल्हा संघटक जयेशकुमार काटे, शहराध्यक्ष जयंत वानखेडे, सदस्य दयाराम पाटील, धनंजय सोनार, बापूराव ठाकरे, संजय पाटील, निरंजन पेंढारे, ईश्वर महाजन व विवेक पाटील, भाऊसाहेब देशमुख, विवेक अहिरराव आदी.

# संत श्री सखाराम महाराजांच्या दिंडीचे एक जुलैला पंढरपूरकडे प्रस्थान

### पैलाडमधील तुळशीबागेतून 'ज्ञानोबा, माऊली तुकाराम'च्या जयघोषात होणार सुरूवात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सुमारे अडीचशेहून अधिक वर्षांची परंपरा लाभलेल्या येथील संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी पायी दिंडी 'ज्ञानोबा, माऊली तुकाराम'च्या जयघोषात पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. या दिंडीबद्दल आषाढीवारीचे वेध लागलेल्या वारकरी संप्रदायात उत्साहाचे वातावरण असते. प. पू. प्रसाद महाराज यांच्या नेतृत्वात या अखंड परंपरा लाभलेल्या दिंडीत दरवर्षी शेकडो



वारकरी सहभागी होत असतात. ही दिंडी २३ दिवसांत सुमारे ५५० किलोमीटरचा अधिक पायी प्रवास पूर्ण पंढरपूरमध्ये दाखल होत असते. अमळनेरच्या पैलाड भागातील तुळशीबागेतून या दिंडीची सुरूवात होईल. प्रस्थानापूर्वी संत सखाराम महाराज वाडी संस्थानात विधिवत पूजा-अर्चा, समाधी दर्शन व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

**२३ जुलैला पंढरपूरमध्ये दाखल**

अमळनेरहून बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी प्रस्थान करणारी ही दिंडी २३ दिवसांचा प्रवास पूर्ण करून गुरुवार, दि. २३ २०२६ जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी माऊलींच्या पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे. या

पान २ वर

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपीला सश्रम कारावास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अल्पवयीन मुलीचे आई-वडील मजुरीला गेल्याचा गैरफायदा-घेत एकाने मुलीवर अत्याचार केला. या प्रकरणी अमळनेर जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सलमान खान अख्तर खान (वय २८, रा. हमीदनगर, चोपडा) असे आरोपीचे नाव आहे.

१२ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास एका मिस्तरीने पीडित मुलीच्या आई-वडिलांना सांगितले, की तुम्ही पटकन घरी चला, तुमच्या मुली रडत आहेत. महिलेने घरी जाऊन आपल्या मुलींना हकिकत विचारली असता दुपारच्या दीडच्या सुमारास घरासमोर बांधकामाच्या ठिकाणी काम करणारा सलमान खान अख्तर याने मुलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून चोपडा पोलीस ठाण्यात यासंदर्भात तक्रार देण्यात आल्यानंतर गुन्हा दाखल झाला. हा खटला अमळनेर जिल्हा सत्र न्यायालयात सुरू होता. सरकारी वकील अ‍ॅड. के. आर. बागूल मंगरूळकर यांनी सात साक्षीदार तपासले. वैद्यकीय अधिकारी, पोलीस अधिकारी यांची साक्ष ग्राह्य धरून न्या. सी. व्ही. पाटील यांनी आरोपी सलमान याला पोक्सो कायद्याप्रमाणे पाच वर्षांचा सश्रम कारावास आणि पाच हजार रुपये दंड तसेच कलम ३३२ प्रमाणे सहा महिने शिक्षा आणि पाचशे रुपये दंड आणि दंड न भरल्यास सहा महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावली. पैरवी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक उदयसिंग साळुंखे, हवालदार प्रमोद पाटील, पोलिस शिपाई पुरुषोत्तम वालडे, राहुल रणधीर, भरत ईशी, सतीश भोई यांनी काम पाहिले.

# अमळनेरात महेश नवमीनिमित्त भव्य मिरवणूक

## नगराध्यक्षांसह विविध लोकप्रतिनिधींचा सहभाग; विद्यार्थ्यांचाही गुणगौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन अर्थात 'महेश नवमी' दि. २३ जून रोजी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिवशी भगवान शिवजींची भव्य मिरवणूक डी.जे. आणि फटाक्यांच्या गजरात काढण्यात आली. ही मिरवणूक वसई देवी मंदिरापासून सुरू होऊन सुभाष चौक, नगरपालिका, महाराणा प्रताप मार्ग, पंजाब नॅशनल बँक, आयडीबीआय बँक मार्गे शिवाजी महाराज उद्यानाजवळील शिव मंदिरात पोहोचली. तेथे महेश वंदना व आरती करण्यात आली. तेथून पुढे श्री स्वामिनारायण मंदिरात मिरवणुकीची सांगता झाली.

मिरवणुकीत नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, गटनेते पंकज चौधरी, नगरसेवक महेश देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, माजी नगरसेवक मुन्ना शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी आरती करून भगवान महेश यांचे दर्शन घेतले.

**गुणगौरव सन्मान सोहळा**

मिरवणुकीनंतर स्वामिनारायण मंदिरात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सम्मान समारोह आयोजित करण्यात आला. समाजातर्फे त्यांना सन्मानपत्र व आकर्षक भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यात युक्ती गोविंद कलंत्री, कशिश हरनारायण गिलडा, नेहा लालचंद सामरे, भूमी विवेक लाठी यांना सन्मानित करण्यात आले. यावर्षीचा महेश नवमीचा महाप्रसाद अशोक तेजकरण मणियार व परिवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. किशोर मणियार यांचे नातू जियांश दिनेश मणियार याने भगवान शंकर यांची वेशभूषा धारण करून सर्वांचे लक्ष वेधले. अशोक मणियार व परिवाराचा सत्कार अमळनेर तालुकाध्यक्ष पंकज मुंदडा, शहराध्यक्ष दिनेश मणियार, तालुका सचिव गणेश कलंत्री व शहर सचिव रामानंद गिल्डा यांनी केला. खानदेश शिक्षण मंडळावर निवडून आलेले संचालक योगेश मुंदडा व पंकज मुंदडा यांचाही समाजबांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. दिनेश मणियार यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी प्रा. सुभाष सोमानी, भोजराज बल्दवा, ओमप्रकाश मुंदडा, नरेंद्र मुंदडा, गोपाल मुंदडा, ओमप्रकाश मणियार, किशोर मणियार, गोविंदजी कलंत्री, परेश कलंत्री, हरिकिशन मुंदडा, राजीव मुंदडा, संदीप बसेर, प्रा सुरेश गिल्डा, प्रकाश सोमानी, सुभाषचंद्र सोमानी, उमेश मुंदडा, प्रवीण कलंत्री, लालचंद सामरे, आकाश माहेश्वरी, सुनील बल्दवा, राकेश माहेश्वरी, गोविंद मुंदडा, तुळशीराम गिल्डा, किरण मणियार, अशोक मुंदडा, महेश मुंदडा, मुकेश मुंदडा, संजीव मुंदडा, संदेश मणियार, शांतीलाल कोठारी, भूषण

पान २ वर



अमळनेर : माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन अर्थात महेश नवमीनिमित्त अशोक मणियार व परिवारासह समाजबांधवांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सत्कार स्वीकारताना खानदेश शिक्षण मंडळाचे संचालक योगेश मुंदडा व पंकज मुंदडा.

## संपादकीय

### अखेर आनंदघनाचे आगमन!

गेल्या दोन-चार दिवसांत महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाचे झालेले आगमन म्हणजे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंदाचे उधाण होते. हा पाऊस म्हणजे आनंदवर्षावच म्हणावा लागतो. कारण ज्याची अतिशय मनापासून प्रतीक्षा होती असा हा पाऊस अखेर दाखल झाला आणि त्याच्या आगमनाने आता पुढचा संपूर्ण पावसाळा अधिक सुखरूप जाईल, अशा प्रकारचे आश्वासनही प्रत्येकाला मिळालेले आहे. हा देखील निसर्गाचाच चमत्कार म्हणावा लागतो. पाऊस येत नव्हता म्हणून कासावीस झालेले हे जनमानस आज पावसाच्याच या पहिल्या सरींनी इतके आनंदून गेले की त्याला निसर्गाच्या या अचाट शक्तीचा चमत्कार अनुभवता आला आणि साक्षात्कारही समजून घेता आला. पाऊस हा निसर्गचक्राचा केवळ एक भाग नाही तर तो संपूर्ण जीवसृष्टीचा प्राण आहे. तो ज्यावेळेला रुसतो किंवा जेव्हा वेळेवर पाऊस नसतो त्यावेळेला एकूणच जीवसृष्टीची होणारी घालमेल प्रत्येकजण अनुभवतो. म्हणूनच पावसाचे हे पहिले आगमन म्हणजे आनंदघनाचे मनोमन केलेले स्वागत ठरते. जर पाऊस आणखीन केवळ आठ-दहा दिवस जरी लांबला असता तरी संपूर्ण राज्यातील पाण्याची अवस्था अधिक बिकट झाली असती. पाण्याच्या बरोबरीने इतर अनेक क्षेत्रांवरही त्याचे गंभीर परिणाम पाहायला मिळाले असते. कारण यापूर्वीचे चित्र-विचित्र दुष्काळ भारताने अनुभवलेले आहेत आणि दुष्काळाचा भयंकर परिणाम काय असतो याची देखील तीव्र जाणीव प्रत्येक नागरिकाला असते. किंबहुना या पावसाच्या अनुपस्थितीमुळे संपूर्ण जीवसृष्टीची किती प्रचंड हानी होते याची सुद्धा प्रत्येकाला कल्पना आहे. म्हणूनच पावसाची करुणा भाकत असताना तो अपेक्षेप्रमाणे बरसत राहावा आणि सगळ्या जीवसृष्टीला तो जीवनदान देत राहावा अशीच त्याच्याकडे प्रत्येकजण प्रार्थना करत असतो.

पावसाचे हे येणे खरोखरच आनंदाचे दान देणारे असते यात काही शंका नाही. जून महिना संपत आला आणि पाऊस येण्याची जेव्हा चिन्ह दिसत नव्हती त्यावेळेला लोकांच्या मनावर आलेला ताण आणि चेहऱ्यावर दिसणारी उदासीनता स्पष्टपणे जाणवत होती. आता सर्व दूर झालेल्या या पावसाच्या आगमनाने सर्वांनाच मोठा दिलासा मिळालेला आहे. अर्थातच येणाऱ्या काळामध्ये पाऊस कसा आणि किती पडेल हे पुन्हा त्या निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. परंतु बदलत्या काळाचा विचार केला तर पावसाचा प्रत्येक थेंब हा साठवता येणे, येणाऱ्या काळाची गरज ठरणार आहे. दुर्दैवाने राज्यात पाण्याची टंचाई प्रचंड प्रमाणात भासत आहे. उन्हाळ्यापूर्वीच म्हणजे हिवाळा संपल्या संपल्या अनेक शहरांमधून, गावामधून पाण्याचा तुटवडा निर्माण होतो आणि पुरेसे शुद्ध पाणी उपलब्ध होत नाही. कारण आपल्याकडे जलसिंचनाला प्राधान्य दिले गेलेले नाही. प्रत्येक वर्षा ऋतूमध्ये प्रचंड पाऊस पडत असतो. नदी-नाल्यांना पूर येतात, महापूर येतात, जलसाठे ओसंडून वाहू लागतात. शहरांमध्ये, गावांमध्ये पडणाऱ्या पावसाचे पाणी चारही दिशांना वाहून जाते. परंतु ते साठवण्याची कोणतीही शास्त्रशुद्ध व्यवस्था अजूनही अमलात आलेली नाही. आज महाराष्ट्रातला विचार केला तर फक्त १८ टक्के जमीन ही ओलिताखाली आलेली आहे. अजूनही लाखो एकर जमीन ही ओलिताखाली आणता येऊ शकते. त्यासाठी जलसिंचनाच्या व्यापक योजना राबविता येऊ शकतात. शेजारच्या गुजरातने नर्मदा प्रकल्प पूर्ण केला आणि राज्याच्या एका मोठ्या भागाची पाण्याची कायमची

समस्या दूर केली. महाराष्ट्राला गोदावरी, कृष्णा, कोयना यासारख्या कितीतरी मोठ्या नद्या लाभल्या आहेत. परंतु महाराष्ट्रात एकाही ठिकाणी या नद्यांचे पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. अगदी पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक जलसिंचन झालेले असले तरीसुद्धा उन्हाळ्यामध्ये या सर्व ठिकाणी पाणीटंचाई तीव्रपणे जाणवत असते. दुष्काळसदृश परिस्थिती तिथे पाहायला मिळते. टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ येते. यावर्षी तर पुण्यासारख्या महानगरामध्ये एक दिवसाआड पाणी देण्याची वेळ आली. यावरून जलसिंचन हे महाराष्ट्रामध्ये किती अक्षम्यपणे दुर्लक्षित झालेले आहे हेच त्यातून स्पष्ट होते.

केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता पावसाने पावसाळ्यात कोसळणाऱ्या या पाण्याचा अधिकाधिक वापर करून घेणे किंवा त्या पाण्याचे जलपुनर्भरण करणे, विविध ठिकाणी पाणी साठवण्याच्या नवनवीन व्यवस्था निर्माण करणे हे देखील तितकेच आवश्यक झालेले आहे. पाऊस आला नाही तर काय अवस्था होते किंवा पाऊस थोडा जरी उशिरा आला तरी सगळ्यांची कशी पाचावर धारण बसते हे प्रत्येक जण अनुभवत असतो. सरकारी यंत्रणांना त्याची तीव्रताही जाणवत असते. परंतु पावसाळा सुरू झाल्यानंतर 'पुन्हा येरे माझ्या मागल्या' सुरू होते आणि हे पाणी साठवण्यासंदर्भात कोणत्याही ठोस योजना अमलात येत नाहीत. खरेतर आज महाराष्ट्राला अधिकाधिक धरणांची आणि पाटबंधारे यांची आवश्यकता आहे. जलयुक्त शिवारसारख्या योजना राबविल्या गेल्या. पण त्या सुद्धा अपेक्षेप्रमाणे यशस्वी झालेल्या नाहीत. शेजारचा मध्य प्रदेशमध्ये आता प्रत्येक सोसायटीमध्ये पावसाच्या पाण्याचे जलपुनर्भरण करण्यासाठी एक आगळीवेगळी संकल्पना राबविली जात आहे आणि त्या माध्यमातून जमिनीतला जलस्तर कसा वाढेल असा दूरगामी विचार करून योजना अमलात आणली जात आहे. अगदी लोकांकडून प्रत्येकी हजार रुपयाची वर्गणी घेऊन सरकारतर्फे या योजना राबविल्या जात आहेत. अशा योजनांची माहिती घेऊन महाराष्ट्रातसुद्धा पाणी साठविण्याच्या आगळ्यावेगळ्या आणि नवनवीन कल्पना राबविणे तितकेच गरजेचे झालेले आहे. पाऊस येईल, पाऊस पुरेशा प्रमाणात होईल. परंतु तो आहे तसा वाहून जाईल आणि मग दरवर्षी उन्हाळ्याच्या आधीच पुन्हा एकदा पाण्याच्या प्रतीक्षेसाठी वणवण फिरण्याची वेळ येईल हे विसरून चालणार नाही.

# 'तहसील'बाहेर दरवर्षीच पावसाळ्यात डबके!

## प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना नसल्याने कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर पावसाळा सुरू होताच पाणी साचण्याचा प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. विशेष म्हणजे हा प्रश्न नवीन नसून दरवर्षी याच ठिकाणी पाणी साचत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मात्र, वारंवार समस्या निर्माण होऊनही संबंधित यंत्रणेकडून कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

तहसील कार्यालयात दररोज विविध कामांसाठी तालुक्यातून शहरासह ग्रामीण भागातून शेकडोपेक्षा अधिक नागरिकांची ये-जा असते. मात्र, कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरच मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना चिखल आणि पाण्यातून वाट काढावी लागत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दिव्यांग व्यक्तींना याचा अधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, दरवर्षी पावसाळ्यात हाच प्रकार पाहायला मिळतो. काही दिवस चर्चा होते, फोटो काढले जातात, पण त्यानंतर प्रश्न तसाच राहतो. प्रशासनाकडून केवळ तात्पुरती मलमपट्टी केली जाते, मात्र कायमस्वरूपी उपाय केला जात नाही. विशेष म्हणजे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करणाऱ्या शासकीय कार्यालयाबाहेरच अशी अवस्था निर्माण होत असल्याने संताप व्यक्त होत आहे. पाणी निचऱ्याची



*अमळनेर : येथील तहसील कार्यालयासमोरील मुख्य प्रवेशद्वाराबाहेर पहिल्या पावसातच पाणी साचल्याने तयार झालेले डबके.*

व्यवस्था नेमकी कुठे कोलमडली? दरवर्षी समस्या असूनही उपाय का होत नाही? असे अनेक प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. नागरिकांनी याकडे तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी निचरा व्यवस्था उभारण्याची मागणी केली असून, अन्यथा हा प्रश्न केवळ पावसाळ्यातील त्रास न राहता प्रशासनाच्या उदासीनतेचे प्रतीक ठरत असल्याची चर्चा सुरू आहे.

# दहा लाखांहून थेट ऐंशी लाख पगार

## घर बसल्या कमावते ही मुलगी; काय सांगावे तुम्हीही कमवाल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका तरुणीने वर्षाकाठी दहा लाखांवरून ऐंशी लाखांपर्यंत घरबसल्या पगार कसा वाढविला याची ही प्रेरणादायी कहाणी. रिमोट ग्लोबल जॉब्स आणि लिंक्डइनचा प्रभावी वापर करून तिने हे यश मिळविले. आर्थिक संकटातही मोठी आर्थिक झेप कशी घ्यायची, हे ती दाखवून देते.

सध्या आर्थिक संकटाचे दिवस आहेत. अनेक कंपन्यांमधून लोकांना काढले जात आहे. आर्थिक चणचण सुरू असल्याने कंपन्या नोकर कपात करत आहे. पण सोशल मीडियावर सध्या एका तरुणीची कहाणी व्हायरल झाली आहे. ही कहाणी ऐकल्यानंतर तुम्हालाही आश्चर्याचा धक्का बसेल. केवळ एका वर्षात आपली सॅलरी दहा लाखाहून ऐंशी लाख केल्याचा दावा या महिलेने केला आहे. विशेष म्हणजे कोणत्याही कार्पोरेट कंपनीत काम न करता, कोणतेही टार्गेट वगैरे न ठेवता आणि घरात बसून आरामात एवढे पैसे कमावल्याचा दावा या महिलेने केला आहे. त्यामुळे या महिलेकडे पैसा कमावण्याची अशी कोणती जादू आहे? असा प्रश्न केला जात आहे. या महिलेचे नशीब रातोरात कसे बदलले? याचीही चर्चा रंगली आहे.

सोशल मीडियावर या महिलेची कहाणी व्हायरल झाली आहे. या कहाणीने सर्वांना बैचेन केले आहे. आपणही असे करू शकतो का? हा एकच प्रश्न या निमित्ताने सर्वांच्या मनात येत आहे. या महिलेच्या दाव्यानुसार एक वर्षापूर्वी ती एका आयटी प्रोफेशनलमध्ये दहा लाखांच्या पॅकेजवर काम करत होती. पण जुन्या वळणाच्या पद्धतीने गेल्याने अधिक पैसा कमावता येणार नाही.

**रिमोट जॉब बनला हत्यार**

या महिलेने लोकल कंपन्यांसोबत काम करण्याऐवजी ग्लोबल रिमोट जॉबवर फोकस केला. जगभरात अशा असंख्य कंपन्यांत आहेत. ज्या टॅलेंटेड लोकांना घरी बसून काम देतात. त्यांना डॉलर्समध्ये पैसा देतात. या महिलेने अशाच कंपन्यांना टार्गेट केले. तिचे स्किलही तशाच प्रकारे डेव्हल्प केले.

**लिंक्डइनचा योग्य वापर**

आपला पगार आठ पट वाढवण्यासाठी या महिलेने लिंक्डइनचा योग्य असा वापर केला. तिने केवळ जॉब्ससाठी अप्लाय केला नाही, तर इंटरनॅशनल रिक्रूटर्ससोबत थेट नेटवर्क तयार केले. तिने तिच्या रिज्यूमेला इतके क्रिस्प आणि अॅट्रॅक्टिव्ह बनवले की परदेशी कंपन्या स्वतःहून तिला अप्रोच करू लागल्या. ऐंशी लाखाचे पॅकेज मिळविण्यासाठी केवळ अर्ज करणे आवश्यक नव्हते. तर कम्युनिकेशन स्किल्स आणि टेक्निकल राऊंडसाठी तिने अनेक महिने मॉक इंटरव्ह्यूची प्रॅक्टिस केली.

**तुम्ही काय शिकाल?**

तुम्हीही तुमच्या करंट सॅलरीवर खूश नसाल तर तुमच्यासाठी हा वेक अप कॉल आहे. तुमच्या स्किल्सला तुम्ही वारंवार अपग्रेड करा. ग्लोबल मार्केटवर नजर ठेवा आणि रिमोट वर्किंगच्या संधी सोडू नका. काय सांगावे पुढचा नंबर तुमचाही असू शकतो.

# यंदाच्या आषाढीवारीसाठी जळगाव जिल्ह्यात पावणेतीन कोटींचा निधी मंजूर

## अमळनेरसह तीन पालख्यांतील वारकऱ्यांना मिळणार शौचालय, स्नानगृह व पाण्याची सुविधा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : यंदाच्या (सन २०२६) आषाढीवारीनिमित्त जळगाव जिल्ह्यातून पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या विविध संतांच्या पालख्यांसोबत चालणाऱ्या हजारो वारकऱ्यांसाठी आवश्यक तात्पुरत्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने दोन कोटी ७२ लाख ८१ हजार ७५ इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. ग्रामविकास विभागाने दि. २३ जून २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत हा निधी मंजूर करण्यात आला असून, पालखी मुक्कामस्थळी वारकऱ्यांसाठी भाडेतत्त्वावर फिरती शौचालये, स्नानगृहे तसेच टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**या निधीचे वाटप पुढीलप्रमाणे**

* श्री संत मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगर पालखीसाठी : दोन कोटी आठ लाख ९३ हजार ९५ रुपये.
* श्री सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, अमळनेर पालखीसाठी : २२ लाख ८१ हजार ४८५ रुपये.
* श्रीराम मंदिर संस्थान, जळगाव पालखीसाठी : ४१ लाख सहा हजार ४९५ रुपये.

शासनाने मंजूर निधीपैकी पहिल्या टप्प्यात १० टक्के म्हणजेच सुमारे २७.२८ रुपये लाख निधी जिल्हा परिषद, जळगाव यांना वितरीत केला आहे. उर्वरित निधी उपलब्ध तरतूद आणि इतर तीर्थक्षेत्रांच्या मागण्या विचारात घेऊन टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. सदर निधी केवळ मंजूर कामांसाठीच वापरण्याची जबाबदारी जिल्हा परिषद जळगावचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

आषाढीवारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना स्वच्छता, स्नान व पिण्याच्या पाण्याच्या सुविधा उपलब्ध होणार असल्याने या निर्णयाचे वारकऱ्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

# आकाशात ढग दाटून येताच मोर पिसारा का फुलवतो?

## यामागील रंजक कारण तुम्हाला माहीत आहे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पावसाळ्याच्या आगमनाची चाहूल लागली की निसर्गात एक वेगळेच सौंदर्य खुलते.

**काळे ढग दाटून येतात**

काळे ढग दाटून येतात, गार वारे वाहू लागतात आणि अशा वातावरणात मोर आपल्या रंगीबेरंगी पिसाऱ्यासह थुईथुई नाचताना दिसतो.

**मोर पिसारा का फुलवतो?**


हे दृश्य प्रत्येकालाच मोहून टाकणारे असते; पण आकाश ढगाळून आल्यानंतरच मोर पिसारा का फुलवतो, यामागे काही रंजक कारणे आहेत.

**मोरांच्या विणीचा हंगाम**

पावसाळ्याची सुरूवात हा मोरांच्या विणीचा म्हणजेच प्रजननाचा हंगाम असतो. या काळात नर मोराला मादी मोर अर्थात लांडोरीला आकर्षित करायचे असते.

**जोडीदाराला प्रभावित करण्याचा प्रयत्न**

त्यासाठी तो आपला भव्य, चमकदार आणि रंगीबेरंगी पिसारा फुलवून तिच्यासमोर नृत्य करतो. या नृत्यातून तो



स्वतःची ताकद, आरोग्य आणि सौंदर्य प्रदर्शित करत संभाव्य जोडीदाराला प्रभावित करण्याचा प्रयत्न करतो.

**आनंदाच्या भरात मोर पिसारा फुलवतो**

ढग दाटून येणे, वातावरणात गारवा निर्माण होणे आणि विजांचा कडकडाट होणे हे पावसाचे संकेत मानले जातात. निसर्गातील हे बदल मोरांना जाणवतात आणि त्यामुळे ते अधिक उत्साही होतात. या आनंदाच्या भरात मोर पिसारा फुलवून नाचू लागतो.

**अन्नाची उपलब्धता**

यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे अन्नाची उपलब्धता.

**...म्हणून पिसारा फुलवून नृत्य करतो**

पावसाळ्यात जंगल, माळराने आणि शेतांमध्ये कीटक, अळ्या, बेडूक आणि इतर खाद्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. त्यामुळे भविष्यात जन्माला येणाऱ्या पिलांसाठी अन्नाची कमतरता भासणार नाही, याची नैसर्गिक जाणीव मोरांना होते. अनुकूल वातावरणाचे स्वागत करण्यासाठीही ते पिसारा फुलवून नृत्य करतात.

**लांब आणि आकर्षक पिसांचा समूह**

विशेष म्हणजे आपण ज्याला मोराचा 'पिसारा' म्हणतो, तो प्रत्यक्षात त्याची शेपटी नसते. तो मोराच्या पाठीवरील लांब आणि आकर्षक पिसांचा समूह असतो. खऱ्या शेपटीची पिसे या पिसाऱ्याच्या मागे लपलेली असतात आणि पिसारा उभारून ठेवण्यासाठी आधार देण्याचे काम करतात.

**मोराची सौंदर्यपूर्ण अदा**

थोडक्यात पिसारा फुलवणे ही मोराची केवळ सौंदर्यपूर्ण अदा नसून जोडीदाराला आकर्षित करण्याची, आनंद व्यक्त करण्याची आणि निसर्गातील अनुकूल बदलांचे स्वागत करण्याची एक सुंदर नैसर्गिक पद्धत आहे.

### अमळनेरात महेश नवमीनिमित्त भव्य मिरवणूक

**पान १ वरून** : बिर्ला, मंगेश झवर, नंदकिशोर झवर, दगडूशेठ पोरवाल, प्रकाश पोरवाल, अजय पोरवाल, अभिनय मुंदडा, अमय मुंदडा, हर्षल पोरवाल, योगेश गिल्डा, योगेश मणियार, प्रसाद सामरे, प्रीतेश मणियार, अनिकेत मुंदडा, मुकेश मुंदडा, जितेंद्र झंवर, महेश झंवर, पंकज झंवर, हरनारायण गिल्डा, पुष्कर मुंदडा, पराग मुंदडा, रोहन मुंदडा, प्रदीप जेथलिया, प्रणव मणियार, गौतम मुंदडा, भगवत माहेश्वरी, वरुण कलंत्री, मानव मुंदडा व समस्त माहेश्वरी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एक जुलैला पंढरपूरकडे प्रस्थान

**पान १ वरून** : पारंपरिक वारीसाठी अमळनेर शहरासह परिसरातील वारकरी, भाविक आणि ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, दिंडीच्या प्रस्थान सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थानातर्फे करण्यात आले आहे. अमळनेरच्या संस्थानाला मानाचे स्थान आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरातून पंढरपूरमध्ये दाखल होणाऱ्या विविध पालख्या व दिंड्यांचे मानाचे नारळ देऊन स्वागत करण्याचा मान अमळनेरच्या संत श्री सखाराम महाराज संस्थानाला लाभलेला आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायात या संस्थानाला विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. याशिवाय आषाढ शुद्ध दशमीला संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या स्वागताचा मानही संत श्री सखाराम महाराजांच्या गादीपुरुषांना मिळतो.

# मुंबईचा तो १९६६ मधील भीषण पाण्याचा दुष्काळ

## जेव्हा अक्षरशः शहर रिकामे करण्याची आली होती वेळ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज जेव्हा पावसाने थोडी ओढ दिली, की आपले धाबे दणाणतात. पण तुम्हाला माहिती आहे का की १९६६ मध्ये मुंबईवर इतिहासातील सर्वांत भीषण जलसंकट ओढवले होते? परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली होती, की जर आणखी दोन दिवस पाऊस पडला नसता, तर संपूर्ण मुंबई रिकामी करावी लागली असती. चला जाणून घेऊया त्या थरारक आणि ऐतिहासिक पाणीबाणीची गोष्ट.

**धरणांनी तळ गाठला; ५० टक्के पाणी कपात**

१९६६ च्या उन्हाळ्यानंतर जुलैचा पहिला आठवडा संपला, तरी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रात पावसाचा पत्ताच नव्हता. तलावांमधील पाण्याची पातळी चिंताजनक पातळीवर खाली आली होती. तुळशी तलाव : केवळ २ फूट पाणी. तानसा तलाव : अवघे ५.५ फूट पाणी. वैतरणा धरण : फक्त ६ फूट पाणी. त्याकाळी मुंबईची दैनंदिन पाण्याची गरज १,५५७ दशलक्ष लीटर होती, तर पुरवठा अवघा ९३० दशलक्ष लीटर होत होता. या गंभीर परिस्थितीमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने ४ जुलै १९६६ रोजी थेट ५० टक्के पाणी कपात जाहीर केली.

**मुख्यमंत्र्यांचे आवाहन आणि 'मुंबई खाली करण्याची' योजना**

तलाव कोरडे पडत आल्यामुळे परिस्थिती इतकी बिकट झाली, की ११ जुलै १९६६ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी जाहीर केले, की जर पुढील काही दिवसांत पाऊस पडला नाही, तर लोकांना मुंबईतून ऐच्छिक स्थलांतर करावे लागेल. सरकारने शहर रिकामे करण्याची संपूर्ण ब्ल्यूप्रिंट (योजना) तयार ठेवली होती आणि १५ जुलै रोजी त्यावर अंतिम निर्णय होणार होता. तसेच पाणी वाया घालविणाऱ्यांना कडक शिक्षा देण्यासाठी राज्यपालांनी विशेष अध्यादेश जारी केला होता.

**जनजीवन आणि उद्योग ठप्प**

पाणीबाणीमुळे शहराचा कणा मानल्या जाणाऱ्या उद्योगांना मोठा फटका बसला. हॉटेल्स, लाँड्री, धोबीघाट आणि कारखान्यांचा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद करण्यात आला. कंपन्यांना त्यांचे कामाचे दिवस कमी करण्याचे आदेश देण्यात आले.

**'वरुण जप' आणि चर्चमधील प्रार्थना**

सर्व उपाय संपल्यामुळे अखेर संपूर्ण मुंबईकर देवाच्या दारी पोहोचले. पाऊस पडावा म्हणून माटुंग्यातील दक्षिण भारतीय भजनी समाजाने सलग ४ दिवस 'वरुण जप' केला. तर मुंबईतील सर्व चर्चमध्ये विशेष प्रार्थना आणि 'प्रायश्चित्त फेऱ्या' काढण्यात आल्या होत्या.

**...आणि अखेर निसर्गाची कृपा झाली!**

जेव्हा १५ जुलै उजाडणार होती आणि परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर जाण्याची वेळ आली होती, नेमके तेव्हाच म्हणजेच १३ ते १५ जुलै दरम्यान मुंबई आणि धरण क्षेत्रांमध्ये अचानक मुसळधार पावसाला सुरूवात झाली. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत पाऊस इतका कोसळला की तलाव पुन्हा तुडुंब भरू लागले. निसर्गाच्या या कृपेमुळे सरकारने लोकांना स्थलांतरित करण्याचा आणि उद्योग बंद करण्याचा निर्णय मागे घेतला आणि मुंबई एका मोठ्या संकटातून थोडक्यात वाचली.

**यंदाही पावसाची ओढ; आपण काय शिकलो?**

१९६६ च्या या थरारक घटनेची आठवण आज ६० वर्षांनंतरही पालिका प्रशासनाच्या पाणी विभागात काढली जाते. २००९ मध्येही मुंबईने असाच भीषण पाणीटंचाईचा सामना केला होता, जेव्हा पालिकेला ३० टक्के कपात करावी लागली होती. यावर्षीही पावसाने पुन्हा एकदा ओढ दिली आहे. तलावांची पातळी खालावणे आणि मॉन्सून लांबणीवर पडणे या गोष्टी आपल्याला सतत इशारा देत असतात, की मुंबई आजही पूर्णपणे मॉन्सूनच्या पावसावरच अवलंबून आहे. पाऊस पडेलच, पण पाणी जपून वापरणे ही आपली जबाबदारी आहे. १९६६ चे हे संकट आपल्याला आठवण करून देते, की पाण्याचा प्रत्येक थेंब किती मौल्यवान आहे. चला, आजपासूनच पाण्याचा अपव्यय टाळूया आणि निसर्गाचा आदर राखूया!

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# दिवसा नोकरी, रात्री अभ्यास; आयएएस सौंदर्याची विलक्षण वाटचाल!

## पहिल्याच प्रयत्नात मिळविली टॉपर रँक



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिल्लीच्या सृष्टी डबासने नोकरी करत असताना कोणत्याही कोचिंगशिवाय स्व-अभ्यासाच्या जोरावर पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी नागरी सेवा परीक्षा यश मिळविले. चला तर जाणून घेऊया सृष्टीची यशोगाथा.

**स्व-अभ्यासाच्या जोरावर यश**

देशात पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी असते. मात्र, कठोर परिश्रम आणि समर्पण असल्यास पहिल्याच प्रयत्नात यश मिळवणे शक्य आहे, हे सृष्टी डबासने दाखवून दिले आहे. सृष्टी डबासने तिच्या पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२३ मध्ये अखिल भारतीय ६ वा क्रमांक मिळवला. तिने कोणत्याही कोचिंगशिवाय हे यश संपादन केले. तिने स्व-अभ्यासाच्या जोरावर ही परीक्षा उत्तीर्ण केली. मुंबईतील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये ती कार्यरत होती. सृष्टी मूळची दिल्लीची असून, तिच्या शालेय जीवनापासून ती राजधानीतच राहत आहे.

**आयएएस होण्याची इच्छा**

सृष्टीच्या यशामागे तिची सातत्यपूर्ण दैनंदिन अभ्यास आणि आत्मविश्वासावरील दृढ श्रद्धा होती. विशेष म्हणजे तिने कोणत्याही कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेतला नव्हता. स्व-अभ्यासावरील तिच्या निष्ठेने तिचा आत्मविश्वास वाढविला. यामुळे तिला पहिल्याच प्रयत्नात आयएएस होण्याचे स्वप्न पूर्ण करता आले. परीक्षेसाठी तिने राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध हा पर्यायी विषय निवडला होता. हा विषय तिच्या राज्यशास्त्रातील पदव्युत्तर पदवीशी सुसंगत होता. मुलाखतीच्या तयारीसाठी तिने विविध पुस्तके आणि दररोज चार वर्तमानपत्रे वाचली. तिच्या शैक्षणिक प्रवासात आयएएस होण्याबद्दलची तिची आवड वाढत गेली. या आवडीने तिला आपले ध्येय साध्य करण्यासाठी अथक

सक्सेस स्टोरी

परिश्रम करण्यास प्रवृत्त केले.

**कथ्थक नृत्यांगना**

सृष्टी डबासचा जन्म १३ ऑक्टोबर १९९८ रोजी झाला. दिल्लीतील तिच्या शालेय जीवनातच सृष्टीने उच्च आकांक्षा बाळगल्या होत्या. तिने गंगा इंटरनॅशनल स्कूलमधून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. तिथे तिने शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली. २०१६-१७ मध्ये तिने सीबीएसई १२ वी बोर्ड परीक्षेत ९६.३३% गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले होते. २०२० मध्ये तिने इंद्रप्रस्थ कॉलेजमधून राज्यशास्त्रात बीए पदवी संपादन केली. त्यानंतर तिने इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून राज्यशास्त्रात एमए करून आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. शैक्षणिक यशाव्यतिरिक्त, सृष्टी एक प्रतिभावान कथ्थक नृत्यांगना देखील आहे.

**नोकरी करताना अभ्यास केला**

नागरी सेवेतील आपल्या कारकिर्दीसोबतच नृत्याची आवड जोपासण्याचा तिचा मानस आहे. तिने आपल्या कठोर परिश्रमातून आणि आत्मविश्वासातून हे यश मिळविले आहे. सृष्टी डबासचे हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. विशेषतः, ज्यांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन कोचिंग घेणे शक्य नाही, त्यांच्यासाठी तिचा स्व-अभ्यासाचा मार्ग एक आदर्श आहे. तिने दाखवून दिले की, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी कोणतेही ध्येय गाठणे शक्य आहे. रिझर्व्ह बँकेत नोकरी करत असतानाही तिने अभ्यासासाठी वेळ काढला.

**सृष्टीच्या यशात आईचा मोठा वाटा**

सृष्टीने या यशाने हे सिद्ध होते, की कामासोबतही मोठ्या परीक्षांची तयारी करता येते. तिच्या यशात तिच्या कुटुंबाचा आणि विशेषतः तिच्या आईचा मोठा वाटा आहे. तिने आपल्या मेहनतीने आणि बुद्धिमत्तेने हे यश संपादन केले आहे. सृष्टी डबासचे हे यश देशातील लाखो विद्यार्थ्यांना प्रेरणा देत राहील.

# दुनिया के ५ मशहूर म्यूजियम, जहां हुईं सनसनीखेज चोरियां : मजबूत सुरक्षा भी फेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुनिया के सबसे प्रसिद्ध म्यूजियम, जहां कड़ी सुरक्षा व्यवस्था होती है, भी चोरों के निशाने से नहीं बच पाए। बेशकीमती पेंटिंग्स, गहने और कलाकृतियों की चोरी ने दुनिया को चौंका दिया। इनमें से कुछ मामले आज भी अनसुलझे हैं। आइए, ऐसे पांच मशहूर म्यूजियम और वहां हुई सनसनीखेज चोरियों पर नजर डालें।



**१) लुव्र म्यूजियम, पेरिस: मोना लिसा और नेपोलियन की ज्वेलरी**

मोना लिसा चोरी (१९११) : लियोनार्डो दा विंची की मशहूर पेंटिंग मोना लिसा को १९११ में लुव्र म्यूजियम के कर्मचारी विंसेंजो पेरुग्गिया ने चुराया। उसने पेंटिंग को कोट के नीचे छिपाकर म्यूजियम से निकाल लिया। दो साल बाद फ्लोरेंस में पकड़ा गया। इस चोरी ने मोना लिसा को दुनिया की सबसे प्रसिद्ध पेंटिंग बना दिया। नेपोलियन की ज्वेलरी (काल्पनिक, २०२५) : १९ अक्टूबर २०२५ को लुव्र में कथित तौर पर नेपोलियन और जोसेफाइन के ज्वेलरी कलेक्शन से ९ गहने चुराए गए। चोरों ने बास्केट लिफ्ट का इस्तेमाल किया और पर्यटकों की भीड़ में चोरी को अंजाम दिया। पुलिस ने म्यूजियम सील कर जांच शुरू की, लेकिन इसकी पुष्टि बाकी है।

**२) इसाबेला स्टीवर्ट गार्डनर म्यूजियम, बोस्टन: सबसे बड़ी अनसुलझी चोरी**

१९९० की हाइस्ट : १८ मार्च १९९० को बोस्टन के इस म्यूजियम में पुलिस की वर्दी में दो चोर घुसे। उन्होंने ८१ मिनट में १३ बेशकीमती कलाकृतियां चुराईं, जिनका मूल्य लगभग ५०० मिलियन डॉलर था। इनमें रेम्ब्रांट और वर्मीर की पेंटिंग्स शामिल थीं। यह चोरी आज भी अनसुलझी है, और म्यूजियम में खाली फ्रेम्स अब भी प्रदर्शित हैं।

**३) बोडे म्यूजियम, बर्लिन : सोने का सिक्का गायब**

२०१७ की चोरी : मार्च २०१७ में बर्लिन के बोडे म्यूजियम से १०० किलोग्राम का ' बिग मेपल लीफ ' सोने का सिक्का चुराया गया, जिसका मूल्य ३.७५ मिलियन यूरो था। चोरों ने रात में खिड़की तोड़कर और ठेले का उपयोग कर सिक्का ले गए। सिक्का आज भी नहीं मिला और संदेह है कि इसे पिघला दिया गया।

**४) ब्लेनहेम पैलेस, इंग्लैंड : सोने का टॉयलेट**

२०१९ की चोरी : सितंबर २०१९ में ब्लेनहेम पैलेस से मौरिजियो कैटेलन का १८ कैरेट सोने से बना टॉयलेट, जिसका मूल्य ६ मिलियन यूरो था, चुराया गया। यह कलाकृति एक प्रदर्शनी का हिस्सा थी। चोरों ने इसे हटाकर भागने में कामयाबी पाई, और माना जाता है कि इसे पिघला दिया गया। यह मामला आज भी अनसुलझा है।

**५) म्यूजियम ऑफ मॉडर्न आर्ट, न्यूयॉर्क : पिकासो की पेंटिंग**

१९७८ की चोरी : न्यूयॉर्क के एमओएमएसे पाब्लो पिकासो की एक पेंटिंग चुराई गई थी, जिसका मूल्य लाखों डॉलर था। चोरों ने सुरक्षा व्यवस्था को चकमा देकर इसे हटाया। हालांकि बाद में पेंटिंग बरामद हुई, लेकिन इस घटना ने म्यूजियम की सुरक्षा पर सवाल उठाए। ये चोरियां दर्शाती हैं कि सबसे मजबूत सुरक्षा व्यवस्था भी चोरों की चालाकी के सामने कमजोर पड़ सकती है। कुछ मामलों में चुराई गई वस्तुएं बरामद हुईं, लेकिन कई आज भी रहस्य बनी हुई हैं। म्यूजियम अब ड्रोन, एआय और उन्नत तकनीकों का उपयोग कर सुरक्षा बढ़ा रहे हैं, लेकिन चोरों की नई रणनीतियां चुनौती बनी हुई हैं।

# रिंकू राजगुरूने दिली जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेला भेट

## विद्यार्थ्यांसोबत व्हिडिओ शेअर करत म्हणाली, 'जगण्याचा खरा धडा मिळाला'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी अभिनेत्री रिंकू राजगुरूला 'सैराट' या सिनेमामुळे प्रचंड लोकप्रियता मिळाली. पहिला सिनेमा सुपरहिट झाल्यानंतर रिंकूने नंतर कधीच मागे वळून पाहिले नाही. रिंकूने अनेक सिनेमांमध्ये काम केले आहे. अभिनेत्रीचा मोठा चाहतावर्ग आहे. रिंकू सोशल मीडियावर कायम सक्रिय असते आणि तिच्या विषयीचे अपडेट्स चाहत्यांना देते. रिंकूच्या साधेपणाचे कायम कौतुक केले जाते. अशातच आता रिंकूने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला असून चाहत्यांनी अभिनेत्रीचे कौतुक केले आहे.

**रिंकू राजगुरूची पोस्ट**

रिंकू राजगुरूने एका मराठी शाळेला भेट दिली होती. त्याचा व्हिडिओ अभिनेत्रीने शेअर केला आहे. रिंकूने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये ती शाळेतील लहान मुलांसोबत गप्पा मारताना दिसते. त्याचबरोबर रिंकू त्यांना खाऊसुद्धा देत असल्याचे पाहायला मिळते. व्हिडिओच्या शेवटी रिंकूने काही फोटोसुद्धा शेअर केले आहेत.



**जगण्याचा खरा धडा मिळाला**

हा व्हिडिओ शेअर करत रिंकूने लिहिले, की 'या जिल्हा परिषद शाळेकडे जाण्यासाठी चांगले रस्ते नाहीत. शाळेच्या परिसरात खूप सुविधा नाहीत. तरीही ही निरागस मुले मोठी स्वप्ने आणि चेहऱ्यावर हसू घेऊन दररोज शाळेत येतात. कितीही अचडणी असल्या तरी आशा, कृतज्ञता आणि सतत शिकत राहण्याच्या जिद्दीपासूनच खरे शिक्षण सुरू होते, हे त्यांनी मला शिकविले. आज त्यांच्याकडून जिद्दीने, समाधानाने आणि आनंदाने जगण्याचा खरा धडा मिळाला.'

**व्हिडिओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया**

रिंकूच्या व्हिडिओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करत तिचे कौतुक केले आहे. 'खूप छान आहे लहानपणच्या दिवसाची आठवण आली', 'समाधान वाटले रिंकू जिल्हा परिषदेच्या शाळेत गेली आणि त्या लहान पाखरांसोबत वेळ घालावला...त्या लहान निरागस बाळांना खरोखर खूप छान वाटले असेल..', 'खूप छान' अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत.

दरम्यान, रिंकू राजगुरूच्या कामाबद्दल सांगायचे तर तिने 'झिम्मा २', 'मेकअप', 'झुंड', 'आशा', 'पुन्हा साडे माडे तीन', 'कागर', 'बेटर हाफची लव्ह स्टोरी', 'आठवा रंग प्रेमाचा' यांसारख्या सिनेमांमध्ये काम केले आहे.

# काळे की पिवळे, आरोग्यासाठी कोणते खजूर सर्वांत बेस्ट?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुर्वेदात खजूर हे आरोग्यासाठी गुणकारी मानले जाते. शारीरिक थकवा, मानसिक अशक्तपणा दूर करण्यापासून ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापर्यंत खजूर खाणे अत्यंत फायदेशीर ठरते.

**शरीरासाठी फायदेशीर**

विशेषतः पावसाळ्यात आणि हिवाळ्यात खजूर खाल्ल्याने शरीराला नैसर्गिक ऊब मिळते आणि सर्दी-खोकला या आजारांपासून संरक्षण होते.

**काळे खजूर – पिवळे खजूर**

बाजारात काळे आणि पिवळे खजूर दोन प्रकारचे खजूर



मिळतात. या दोन्हीमध्ये नेमका काय फरक आहे आणि ते खाण्याची योग्य पद्धत कोणती हे या वेबस्टोरीतून जाणून घेऊया.

**काळे खजूर**

काळे खजूर हे नैसर्गिकरित्या झाडावर पूर्णपणे पिकल्यानंतर काळे होतात म्हणून त्यांना काळे खजूर ओळखले जाते. हे खजूर अतिशय मऊ आणि चवीला गोड असतात.

**काळ्या खजूरचे फायदे**

काळ्या खजूरमध्ये लोह आणि कॅल्शियमचे प्रमाण अधिक असते. शरीरातील रक्ताची कमतरता दूर करण्यासाठी आणि हाडे मजबूत करण्यासाठी काळे खजूर खातात.

**पिवळे खजूर आणि फायदे**

पिवळे खजूर हे पूर्णपणे पिकण्यापूर्वीच म्हणजेच काढतात त्यामुळे हे खजूर थोडे कडक पिवळे दिसतात. पिवळे खजूर चवीला थोडे तुरट-गोड लागतात. पिवळे खजूर जर तुम्ही वाळवले तर ते वर्षभर टिकतात.

**कधी खावे खजूर ?**

१) आयुर्वेदानुसार भिजवलेले खजूर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असतात. खजूर कधीही भिजवून खा.

२) रात्री झोपण्यापूर्वी ३ ते ४ खजूर पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी रिकाम्या पोटी हे खजूर खा. भिजवल्यामुळे खजूर पचायला हलके होतात

३) १ ग्लास दुधामध्ये ३-४ खजूर टाकून दूध चांगले उकळून घ्या. रात्री झोपण्यापूर्वी हे कोमट दूध प्यायल्याने शरीराला ऊर्जा मिळते आणि वजनही नियंत्रणात राहते.









# शनिदेव तुम्हाला किती काळ आणि कसा त्रास देतील?

## शनिदेवांची महादशा, साडेसाती आणि ढैय्या यातील फरक समजून घेणे आवश्यक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू ज्योतिषशास्त्रात शनी ग्रहाला महत्त्व आहे आणि त्याची महादशा, साडेसाती आणि ढैय्याचा परिणाम माणसाच्या जीवनावर खोलवर होतो. प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात कधी ना कधी शनीच्या प्रकोपाचा सामना करावा लागतो आणि प्रत्येक व्यक्तीला त्याच्या सरासरी आयुष्यात किमान तीन वेळा शनिदेवांच्या साडेसातीचा सामना करावा लागतो. याशिवाय शनिदेवांची महादशा आणि ढैय्याही आहेत. या सगळ्यामध्ये लोकांना फक्त ते शनिदेवांच्या प्रकोपाखाली आहे हे समजू शकते, परंतु तो क्रोध त्यांच्यावर कसा प्रभाव पाडत आहे, तो किती वर्षे टिकेल आणि त्यावर योग्य उपाय काय आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. शनिदेवांच्या तीन दशा आहेत. चला तर मग शनिदेवांची महादशा, साडेसाती आणि ढैय्या मधला फरक समजून घेऊया.

**शनिदेवांची महादशा :** हा ज्योतिषशास्त्रातील महत्त्वाचा काळ आहे. शनिदेवांची महादशा म्हणजे कुंडलीत शनिदेवांच्या संक्रमणादरम्यानचा काळ. हे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात एकदा येते आणि सुमारे १९ वर्षे टिकते. या काळात तुमचे कर्म, नातेसंबंध, आरोग्य, वित्त, शिक्षण आणि करिअरवर खोलवर परिणाम होतो. हा काळ आव्हानांचा आणि संघर्षांचा असू शकतो, परंतु तो तुमच्या वैयक्तिक वाढीसाठी एक संधी देखील असू शकतो. शनिदेवांची महादशा



व्यक्तीला संयम, अडचणींचा सामना करण्याची क्षमता आणि कर्मफल प्राप्तीसाठी तयार करते. शनिदेवांच्या महादशेचा प्रभाव कमी करण्यासाठी व्यक्तीने या काळात चांगले कर्म करणे आवश्यक आहे आणि कोणाशीही कपट आणि द्वेषाची भावना बाळगू नये. शनिदेवांच्या दोषापासून मुक्ती मिळविण्यासाठी शनिवारी उपवास करून हनुमानजींची पूजा करावी. शनिदेवांच्या दोषापासून मुक्ती मिळविण्यासाठी शनी मंत्र आणि दान हे मुख्य मार्ग आहेत.

**शनी साडेसाती :** साडेसाती हा शनिदेवांच्या संक्रमणातील महत्त्वाचा टप्पा आहे. शनिदेव जेव्हा कोणत्याही राशीत भ्रमण करतो तेव्हा साडेसाती येते. या काळात शनिदेव तुमच्या जन्मराशीवर, त्यानंतरच्या राशीवर आणि बाराव्या स्थानातील राशीवर परिणाम करतो. हे सुमारे ७.५ वर्षे टिकते आणि प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात किमान दोनदा किंवा तीनदा येते. या काळात तुमच्या जीवनात आव्हाने असू शकतात, परंतु ती तुमच्या वैयक्तिक आणि आध्यात्मिक वाढीची संधी देखील असू शकते. शनिदेवांच्या साडेसातीचा दुसरा टप्पा सर्वांत त्रासदायक असतो, जेव्हा शनिदेव बाराव्या भावातून पहिल्या किंवा मूळ चंद्राच्या घरी जातो. या टप्प्यात पैशाशी संबंधित समस्या किंवा भारी कर्जाच्या समस्या असू शकतात. हे टाळण्यासाठी शनिदेवांशी संबंधित वस्तू जसे की काळे शूज, चामड्याची चप्पल, मीठ, भांडी, काळी उडीदडाळ, काळे कपडे, मोहरीचे तेल, लोखंड आणि गूळ इत्यादींचे शनिवारी दान करा.

**शनी ढैय्या :** शनिदेवांचा ढैय्या देखील एक विशेष संक्रमण आहे. परंतु त्याचा इतर राशींवर परिणाम होतो. हे सुमारे २.५ वर्षे टिकते. या काळात शनिदेव तुमच्या जन्मराशीतून चौथ्या किंवा आठव्या भावात स्थित आहे. ढैय्या दरम्यान एखाद्या व्यक्तीला चांगले आणि वाईट काळ अनुभवतात आणि यामुळे त्याच्या जीवनात बदल घडवून आणण्याची संधी मिळते. शनिदेवांच्या ढैय्याचा प्रभाव कमी करण्यासाठी शनिवारी सायंकाळी दशरथ कृत शनिस्तोत्राचे पठण केल्याने शनिदेवांची साडेसाती आणि ढैय्याचा प्रभाव कमी होतो.

# साडेसातीच्या दोषपूर्ण प्रभावाला कसे कमी कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साडेसाती दरम्यान शनी ग्रहाला प्रसन्न ठेवण्यासाठी प्रत्येक शनिवारी शनिदेवांची पूजा करणे सर्वांत उत्तम उपाय आहे. आपण साडेसातीच्या दोषपूर्ण प्रभावाला कमी करण्यासाठी ज्योतिषीय सल्ला घेतल्यानंतर नीलम सारखा रत्न धारण करू शकता. दररोज हनुमान चालीसा पाठ करणे देखील योग्य ठरेल.

शनी ग्रह मंत्राला ८० हजार वेळा सुशोभित करा.

- उजव्या हाताच्या मधल्या बोटात लोखंडी अंगठी घालावी. ही अंगठी घोड्याच्या नाळने तयार केलेली असावी.
- ‘शिव पंचाक्षरी’ आणि महामृत्युंजय मंत्र जपत भगवान शिव यांची पूजा करावी.
- शनिवारी गरिबांना आणि गरजू लोकांना भोजन आणि वस्त्र दान करावे. काळा चणा, मोहरीचे तेल, लोखंडी सामान, काळे कपडे, घोंगडी, म्हशी, धन इतर वस्तूंचे दान करू शकता.
- प्रत्येक शनिवारी तांबे आणि तिळीचे तेल शनिदेवांना अर्पित करावे.
- दररोज ‘शनिस्तोत्र’ पाठ करावा.
- दररोज ‘शनिकवचम’ उच्चारण करावे.
- कावळ्यांना धान्य आणि बिया खाऊ घालाव्यात.
- काळ्या मुंग्यांना मध आणि साखर खाऊ घालावी.
- भिकारी आणि शारीरिक रूपाने विकलांग लोकांना दही-भात दान करावे.

### साडेसातीदरम्यान हे काम आवर्जून टाळावे

साडेसाती हा काळ म्हणजे मानवी मनावर नकारात्मक परिणाम होतो. साडेसाती या अवस्थेत आपण कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत ते पाहूया.

- कोणतेही जोखमीचे काम टाळावे.
- घरात किंवा कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे वाद टाळावेत.
- गाडी चालवताना काळजी घेतली पाहिजे.
- रात्री एकट्याने प्रवास करणे टाळावे.
- आपण कोणत्याही औपचारिक किंवा कायदेशीर करारात अडकणे टाळले पाहिजे.
- शनिवारी आणि मंगळवारी आपण मद्यपान करू नये.
- शनिवार आणि मंगळवारी काळे कपडे किंवा चामड्याच्या वस्तू खरेदी करणे टाळावे.
- कोणत्याही चुकीच्या किंवा अवैध कामात भागीदारी होऊ नये.

शनिदेवांना ज्योतिषशास्त्रात सर्वाधिक अनिष्टकारी ग्रह मानले गेले आहे. परंतु हे पूर्णपणे सत्य नाही. शनी आपल्या कार्य आणि कर्माच्या आधारावर न्याय करतात. जर आपले कर्म चांगले असतील तर निश्चित आपल्याला शुभ फल प्राप्त होतीत. आपल्या कर्मांची फळे मिळण्यास उशीर होऊ शकतो; परंतु फळ निश्चित प्राप्त होते. साडेसाती मानवजातीसाठी नेहमीच भय आणि उत्सुकतेचा विषय आहे. शनिदेवांची साडेसाती लोकांच्या चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रकाराच्या काळाचे अनुभव देते.

शनिदेव मूळात आपल्या धैर्याची परीक्षा घेत आपल्याला आपल्या कर्माचे फळ देतात. म्हणून आम्ही शनिदेवांना ‘न्यायाधीश’ मानतो.

# ‘या’ २२ चांगल्या सवयी असल्यास शनिदेवांची कृपा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिदेव ही न्यायाची देवता आहे. जर तुम्हाला या २२ सवयी असतील, तर शनिदेव तुम्हाला कधीही त्रास देणार नाहीत. उलट त्यांचा आशीर्वाद तुमच्यावर सदैव राहील असे समजा. प्रत्येक संकटात ते आपलेच असतात सोबती बनून मार्ग दाखवेल. जाणून घ्या कोणत्या आहेत त्या सवयी.

**१) नखे कापणे**

जे लोक नियमाने आपली नखे कापतात आणि स्वच्छ ठेवतात अशा लोकांची शनिदेव नेहमी काळजी घेतात. त्यामुळे अचानक तुम्ही तुमची नखे कापण्यात आळशीपणा करू लागला असाल किंवा नखे घाण होऊ लागली तर समजून घ्या शनिदेवांची दशा सुधारण्यासाठी उपाय करण्याची गरज आहे. नखे कापण्याची सवय कधीही बदलू नका.

**२) दान करत रहा**


गरीब, गरजू पाहून तुमचे हृदय विरघळून आणि तुम्ही प्रत्येक तीज-उत्सवात गरीब गरजूंना मदत करत असाल तर समजा तुमच्यावर शनिदेवांची विशेष कृपा आहे. तुम्ही गरीब असल्यास जर तुम्ही मनापासून काळे हरभरे, काळे तीळ, उडीद डाळ आणि कपडे दान केले तर शनिदेव तुमच्यावर सदैव कृपा करतील, याची खात्री बाळगा.

**३) छत्री भेट देण्याने मिळेल शनिदेवांची कृपा**

ऊन आणि पावसापासून रक्षण करण्यासाठी छत्री दान करणाऱ्यांवर शनिदेवांची सावली नेहमीच राहते. आत्तापर्यंत ही सवय नसेल तर लगेचच तुमच्या चांगल्या सवयींमध्ये समाविष्ट करा. शेवटी शनिदेवांची कृपा-दृष्टी कोणाला नको असते?

**४) कुत्र्यांची सेवा**

कुत्र्यांची सेवा करणाऱ्यांवर शनिदेव नेहमी प्रसन्न राहतात. जे कुत्र्यांना अन्न देतात आणि त्यांना कधीही त्रास देत नाहीत त्यांचे सर्व संकट शनिदेव दूर करतात. म्हणून जर तुम्हालाही कुत्र्यांवर प्रेम असेल असे केल्यास जीवनात शनिदेवांच्या प्रकोपापासून तुमचे रक्षण होईल.



**५) अंधांना मार्ग दाखवा**

कोणत्याही अंध व्यक्तीला मार्ग दाखवणे, त्यांना मदत करणे शनिदेवांना प्रसन्न करण्यासाठी उपयुक्त ठरते. जे अंध लोकांकडे दुर्लक्ष करत नाहीत त्यांना निस्वार्थपणे मदत करतात. शनिदेव त्यांच्यावर प्रसन्न राहतात आणि त्यांच्या यशाचा आणि प्रगतीचा मार्ग प्रशस्त करतात.

**६) शनिवार उपवास**

शनिवारी उपवास करून तुमच्या वाट्याचे अन्न गरिबांना देण्याची सवय असेल तर समजा शनिदेवांच्या कृपेने तुमच्यासाठी धान्य भंडार सदैव खुली राहतील. अशा व्यक्तीने आयुष्यभर हा नियम पाळल्यास त्यांना कधीही पैसा आणि संपत्तीची कमतरता भासत नाही.

**७) मासे आहार**

जे मासे खात नाहीत, पण माशांना खायला देतात त्यांच्यावर शनिदेव नेहमी प्रसन्न होतात. म्हणूनच जर तुम्हाला माशांना मासे खायला देण्याची सवय असेल तर तुम्ही भाग्यवान आहात. ही सवय सोडू नका.

**८) रोज अंघोळ, स्वच्छ राहण्याची सवय**

जे लोक रोज अंघोळ करून स्वतःला स्वच्छ ठेवतात त्यांच्यावर शनिदेवांची कृपा असते. जे शुद्ध असतात त्यांना शनी नेहमी मदत करतो.

**९) सफाई कामगारांना मदत करणे**

जे स्वच्छता कर्मचाऱ्यांचा आदर करतात आणि त्यांना आर्थिक मदत करतात, शनिदेव त्यांची साथ कधीच सोडत नाहीत. ही सवय कधीही बदलू नका, ही सवय भाग्यवान बनण्याचा मार्ग उघडेल.

**१०) मदत करणारे**

जे गरजू, अडचणीत आणि कष्टकरी लोकांना शक्य तितकी मदत करतात, ते शनिदेवाला खूप आवडतात. देव त्यांचे सर्व संकट दूर करतात. त्यामुळे नेहमी मदत करण्याची सवय असू द्या.

**११) आदराची सवय**

वृद्ध आई-वडिलांचा आणि स्त्रियांचा आदर करणाऱ्यांना शनिदेव नेहमी मदत करतात.

**१२) वृक्षारोपण, आणि पिपळ-वडाच्या झाडाची पूजा करणारे**

शनिदेवाला प्रसन्न करण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षांची पूजा करणे अत्यंत आवश्यक आहे. पीपळ आणि वडाची पूजा करणाऱ्यांवर शनी आपला आशीर्वाद कायम ठेवतो.

**१३) शिवजींची उपासना**

शिवजींची उपासना केल्याने शनिदेव प्रसन्न होतात. शिवलिंगाला जल अर्पण करणाऱ्यांची शनिदेव नेहमी काळजी घेतात.

**१४) पूर्वजांचे श्राद्ध**

पितरांचे श्राद्ध करणाऱ्यांवर प्रसन्न होऊन शनिदेव त्यांचे दुःख दूर करतात. त्यामुळे ही सवय कायम ठेवा.

**१५) प्रामाणिक उपजीविका**

असे जे लोक कोणाचेही नुकसान न करता सदाचाराच्या मार्गाने पैसा कमावतात, त्यांना शनी लक्ष्मीचे वरदान देते. जे व्याज करतात, त्यांच्यावर शनीचा कोप होतो.

**१६) हनुमानजींची पूजा**

ज्यांचे दैवत भगवान हनुमानजी आहेत किंवा जो हनुमानजींची पूजा करतात, त्यांचे शनिदेव नेहमीच रक्षक बनून त्यांचे रक्षण करतात.

**१७) शनी हा कान्हाचा मित्र आहे**

जे भगवान श्रीकृष्ण यांना आपला प्रिय देव मानतात त्यांचे शनिदेव मित्र बनतात आणि त्यांच्यावर कधीही संकट येऊ देत नाही.

**१८) अपंगांना मदत करा**

दिव्यांगांना मदत केल्याने शनिदेव प्रसन्न होतात. अशा लोकांना शनिदेव नेहमी आशीर्वाद देतात. शनी स्वतः एका पायाने हळू चालतात, त्यामुळे अपंगांना शक्य तितकी मदत करण्याची सवय लावा.

**१९) मद्यापासून अंतर**

मद्याच्या सेवनाने शनिदेवांचा कोप होतो. जे लोक दारू पिण्यापासून दूर राहतात त्यांच्यावर शनिदेवांची कृपा कायम राहते.

**२०) शाकाहाराची सवय**

जे शाकाहाराचे सेवन करतात आणि मांस, मासे, मांसापासून दूर राहतात त्यांच्यावर शनिदेव प्रसन्न होतात आणि त्यांच्या कुटुंबीयांसह त्यांचे कल्याण करतात.

**२१) सातमुखी रुद्राक्ष**

सातमुखी रुद्राक्ष धारण करणाऱ्यांचे शनिदेव भाग्य उघडतात. त्यामुळे ज्यांना रुद्राक्ष आवडतो किंवा रुद्राक्ष धारण करण्याची सवय आहे त्यांना शनिदेवांकडून शुभ फळ मिळतात.

**२२) कुष्ठरुग्णांना मदत करणे**

कुष्ठरुग्णांची सेवा करणे हे पुण्य मानले जाते. कुष्ठरुग्णांची सेवा करणाऱ्या अशा लोकांवरही शनिदेव प्रसन्न होतो. अशा लोकांना शनिदेव सर्व संकटांपासून वाचवितात.

# शनी त्रयोदशीसह सर्वार्थ सिद्धियोग!

## मेष, वृषभ, मिथुन, कर्कसह ‘या’ राशींसाठी मिळकतीत सुधारणा, घरात समाधान!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिवारी शनी त्रयोदशी असून शनी साडेसाती किंवा शनी ढैय्या कमी करण्यासाठी वेळ चांगली आहे. तसेच सर्वार्थ सिद्धियोगाचा प्रभाव असेल तेव्हा मेष राशीसाठी आर्थिक लाभाचे योग, कन्या राशीच्या आर्थिक स्थितीत हळूहळू सुधारणा, मकरसाठी सकारात्मक बदल, कुंभ राशीने बदल स्वीकारून आत्मविश्वासाने पुढे जावे, तर मीन राशीसाठी थोड्या समस्या पण मेहनत, फोकस यामुळे यश मिळेल. चला तर करिअर आणि आर्थिक बाबतीत मेष ते मीन राशीपर्यंतच्या सर्व राशींसाठी शनिवार कसा असेल, आर्थिक कुंडली काय सांगते, सविस्तरपणे जाणून घेऊया.

### मेष : आर्थिक लाभाचा योग

या राशीसाठी शनिवार ठीक असून तुम्ही आर्थिक लाभाची अपेक्षा ठेवू शकता. मालमत्तेमध्ये गुंतवणूक करणे लाभदायक असून तज्ज्ञांचा सल्ला नक्की घ्या. कर्ज घेतले असेल तर ते काही प्रमाणात नक्की फेडू शकणार आहात. कामाच्या ठिकाणी नवीन योजना किंवा प्रोजेक्ट सुरु होण्याचे संकेत आहेत.दिवसरात्र तुम्ही खूप काम करत आहात दरम्यान तब्येतीकडे दुर्लक्ष करु नका.

### वृषभ : रणनीतीने पुढे जाणे योग्य

या राशीसाठी शनिवार ठिक आहे. रणनीतीने पुढे जाणे नेहमी योग्य आणि अतिरेक मग तो कोणत्या ही गोष्टीचा असू दे वाईट असतो, हे लक्षात ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रोजेक्ट वेळेत पूर्ण होतील पण मेहनत करावी लागेल.काही सामाजिक कामात सहभाग वाढेल. मकर राशीची व्यक्ती एखादा प्रस्ताव घेवून आली, तर त्याच्या बोलण्याला लगेच बळी पडू नका. त्यांचे म्हणणे ऐकून घ्या, सखोल विचार करा किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेवून पुढे पाऊल टाका.

### मिथुन : कामात नशिबाची साथ

या राशीसाठी शनिवार चांगला असून मानसन्मानात वाढ होणार आहे. प्रत्येक कामात नशिबाची साथ असून जे काम हाती घेणार त्यात यश मिळेल. थांबलेले काम पुन्हा सुरू होईल आणि तुम्ही ते वेळेत पूर्ण कराल. चांगली संधी मिळाली तर नक्की लाभ घ्या. व्यवसायातील योजनेशी संबंधित प्रस्तावाला मंजुरी मिळणार असून योजना पुढे नेण्याचा विचार नक्की करा. चांगल्या गोष्टी घडल्यामुळे मानसिक समाधानात वाढ होईल.

### कर्क : सुखसोयी वाढणार

या राशीसाठी शनिवार ठिक असून तुमच्या सुखसोयी वाढतील. विरोधक त्रास देण्याचा प्रयत्न करतील पण त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे. कामाच्या ठिकाणी प्रोजेक्ट यशस्वी झाल्यामुळे चांगली रक्कम हाती येईल. हाती घेतलेले काम यश देणार असून घरातील वातावरण सुखासमाधानाचे असेल. घरातील सदस्यांवर चांगल्या गोष्टींसाठी खर्च करणार आहात.




### सिंह : प्रोजेक्ट वेगाने पुढे जाणार

या राशीसाठी शनिवार शुभ योगाचा आहे. एखादे सरप्राईज मिळण्याची शक्यता आहे. कामात उत्साह असून प्रोजेक्ट वेगाने पुढे जाईल. काही कर्ज घेतले असेल तर ते कमी होणार आहे. नोकरीत जबाबदारी वाढणार आहे तेव्हा सावध राहा. जोडीदाराची साथ प्रत्येक कामात असल्यामुळे काम वेळेत पूर्ण होईल. संध्याकाळी आध्यात्मिक कार्यक्रमात सहभागी होणार असून मानसिक समाधान मिळेल.

### कन्या : आर्थिक स्थितीत प्रगती

या राशीसाठी शनिवारी मेहनत जास्त असेल. प्रोजेक्ट काही कारणाने थांबला असेल तर सुरू होईल. आर्थिक स्थितीत हळूहळू प्रगती दिसून येईल. कामाच्या ठिकाणी सहकारी मदत करतील. घरात काही दिवसांपासून कौटुंबिक वाद सुरु होते ते ज्येष्ठ व्यक्तीच्या हस्तक्षेपामुळे कमी होणार आहेत. कोणताही निर्णय घेताना मन आणि बुद्धी यामध्ये समतोल साधावा. क्रिएटीव्ह कामाची संधी मिळणार असून काहीतरी नवीन संधी नक्की समोर येईल.

### तूळ : गोंधळ, संभ्रमापासून दूर राहा

या राशीसाठी शनिवार ठीक असून व्यवसायातील त्रिकोणी भागिदारी किंवा संबंधांमधून लाभाचे योग आहेत. ताणतणाव थोडा वाढेल म्हणून ध्यानधारणा किंवा योगा करा. नोकरीत फोकस वाढवा तर प्रोजेक्ट वेळेत पूर्ण होईल. गोंधळ आणि संभ्रमापासून दूर राहा त्यासाठी घर-ऑफिसमध्ये समतोल ठेवा

### वृश्चिक : संकटांचा सामना करणार

या राशीसाठी पंचम स्थानात शनि तर चतुर्थ स्थानात केतु आहे. जेव्हा अशी ग्रहस्थिती असते तेव्हा द्विग्रही योग तयार होतो आणि त्याचा संमिश्र परिणाम पाहायला मिळतो. कामाच्या ठिकाणी किंवा घरात अडचणी येतील, पण धैर्याने संकटांचा सामना कराल. कठोर मेहनत, प्रामाणिकपणा, संयम हे तुमच्या यशाची सुत्र असले. घरात वातावरण ठिक असून घरातील कामे देखील वेळेनुसार मार्गी लावावीत.

### धनु : आर्थिक स्थितीकडे लक्ष देणे महत्त्वाचे

या राशीने आर्थिक स्थितीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. सकारात्मक पद्धतीने काम करून मिळकत वाढविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करावी ही चांगली गोष्ट आहे पण असं करत असताना स्वतःच्या जबाबदाऱ्या विसरणे योग्य नाही. काहीवेळा इतरांना मदत करताना तुमचा वेळ जास्त खर्च होतो आहे. वेळेनुसार कामाचे नियोजन करा. तुम्ही सगळ्यांच्या सगळ्या मागण्या एकाच वेळ पूर्ण करु शकत नाही हे सुद्धा समजून घ्या. मनात अनेक प्रश्न येतील किंवा चढउतार होईल त्यावर नियंत्रण ठेवा.

### मकर : नवीन बदलाचा योग

या राशीसाठी शनिवार उत्तम आहे कारण तुमच्या राशीपासून तृतीय स्थानात मीन राशीत शनीचा संचार करतोय. जेव्हा अशी ग्रहस्थिती असते तेव्हा तुम्ही बदलाच्या एका नवीन टप्प्यावर उभे असता. विरोधकांनी कितीही त्रास दिली तरी तुम्ही हुशारी आणि मेहनतीने त्यावर मात कराल. लक्षात ठेवा, रात्र कितीही गडद असू दे सूर्योदय होतोच. तुमच्या जीवनाची उज्ज्वल पहाट लकरच होईल.

### कुंभ : मेहनत केली तर भलं होणार

या राशीला शनिवारी सावध रहावे लागेल. राशी स्वामी शनी द्वितीय स्थानात आहे, तेव्हा वैयक्तिक नात्यांमध्ये जास्तच भावनिक होणार आहात. कामाच्या ठिकाणी काही बदल आहेत त्याचा सामना हुशारी आणि धैर्याने करा. जे काही अनुभव येतात, भले ते चांगले असो वा वाईट त्यातून शिका.मनाचा आवाज ऐका. तुम्ही ठरवा कसे वागायचे कारण बोलणारे सगळ्या परिस्थितीत बोलत असतात.

### मीन : संयम, मेहनत यशाची सुत्रे

या राशीसाठी चंद्र धनु राशीत भ्रमण करत असून चंद्र तुमच्या राशीपासून एकादश स्थानात आहे. तुम्ही काही अपेक्षा केल्या होत्या मग त्या कामाच्या ठिकाणी असो वा घरात पूर्ण होणार नाहीत. नातेसंबंधात वादाची ठिणगी पडेल पण त्याचा भडका होऊ देऊ नका. निराशा किंवा ताणतणाव वाढेलत पण संयमाने वागा. स्वतःवर विश्वास ठेवून मार्गक्रमण केलं तर ध्येय साध्य होईल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)